सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ११/१०/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन निर्णय क्र.पीओएस-३५२४/प्र.क्र.११०/पोल -३, दि.१० ऑक्टोबर २०२४

**विषय :-** पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई यांच्या आस्थापनेवर उपलब्ध मनुष्यबळातून नवीन उलवा पोलीस ठाणे निर्मितीबाबत

******

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र पीओएस-३५२४/प्र.क्र.११०/सेवा-३, दि.१० ऑक्टोबर २०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१०१०१८१५००६८२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयनुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**( प्रविण शिखरे )**
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग,महाराष्ट्र राज्य,मुंबई
पोलीस आयुक्त, लोहमार्ग,मुंबई
कार्यासन अधिकारी, का.क्र. २६-अ

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई यांच्या आस्थापनेवर उपलब्ध मनुष्यबळातून नवीन उलवा पोलीस ठाणे निर्मितीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः पीओएस-३५२४/प्र.क्र.११०/पोल-३**
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : १० ऑक्टोबर, २०२४.

**संदर्भ** :-

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२६-अ/४७/उलवा पो.ठा./नवी मुंबई/२४/२०२४, दि. १२.०८.२०२४.

२) वित्त विभाग अनौ. सं. क्र. ५१८/२०२४/ व्यय-७ दि. ३०.०९.२०२४

**प्रस्तावना** :-

प्रस्तावित उलवा पोलीस ठाणे परिसरात मोठमोठ्या नागरी वस्ती, महत्वाचे प्रकल्प, रेल्वे स्थानके इ. आस्थापन सुरु आहेत. तसेच या परिसरात अंदाजे १,६०,००० इतकी लोकसंख्या झालेली आहे. वाढत्या लोक वस्तीमुळे गुन्हेगारीत वाढ होत असल्याने कायदा व सुव्यवस्था राखणेसाठी सध्याच्या पोलीस ठाण्यांवर ताण पडत आहे. त्याचबरोबर अटल सेतू व शिवाजीनगर ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ असा कोस्टल रोड असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक वाढत आहे. सदर प्रस्तावित उलवा पोलीस ठाणेचा परिसर एन. आर. आय. सागरी पोलीस ठाणे, न्हावाशेवा पोलीस ठाणे व पनवेल शहर पोलीस ठाणे या तीन पोलीस ठाण्यांच्या हद्दीत समाविष्ठ आहे त्यामुळे नागरिकांना आपल्या तक्रारी, पासपोर्ट, चारित्र्य पडताळणी या नागरी सेवांसाठी अडचणींना सामोरे जावे लागते, सदर बाबी विचारात घेऊन पोलीस महासंचालक (नि. व. स), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ रोजींच्या पत्राद्वारे पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांच्या आस्थापनेवर एन. आर. आय. पोलीस ठाणे, न्हावाशेवा पोलीस ठाणे व पनवेल शहर पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन सुसज्ज उलवा पोलीस ठाणे निर्माण करण्यास व त्याकरीता येणाऱ्या रु. २,१२,३०,०००/- (रु. दोन कोटी बारा लाख तीस हजार मात्र) इतक्या अनावर्ती खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला होता. सदरहू प्रस्ताव शासनाच्या विचारधीन होता.

**शासन निर्णय**:-

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवर एन. आर. आय. पोलीस ठाणे, न्हावाशेवा पोलीस ठाणे व पनवेल शहर पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन उलवा पोलीस ठाणे निर्माण करण्यास शासन मान्यता देत आहे. त्याकरीताचे मनुष्यबळ उपलब्ध मनुष्यबळातून भागविण्यात यावे.

२. तसेच उक्त पोलीस ठाण्याकरिता रु. २,१२,३०,०००/- (दोन कोटी बारा लाख तीस हजार मात्र) इतक्या अनावर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदरहू खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. उपरोक्त पोलीस ठाणेकरिता हद्दनिश्चितीचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाने शासनास सादर करावा.

४. सदर शासन निर्णय हा संदर्भीय क्र.२ वित्त विभाग अनौ. सं. क्र. ५१८/२०२४/व्यय-७ दि. ३०/९/२०२४ दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४१०१०१८१५००६८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA T BHALWANE

Digitally signed by RAJENDRA T BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d27581 48ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD51409565 9A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA T BHALWANE
Date: 2024.10.10 18:01:48 +05'30'

**( रा. ता. भालवणे )**
**उप सचिव, गृह विभाग**

प्रत,

मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

जिल्हा कोषागार अधिकारी,रत्नागिरी.
उप सचिव(पोल ३),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
निवड नस्ती, पोल-३.